## :: निवेदन ::

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, " मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन " ( Religious Life in Maharashtra under the Marathas ) हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. मनोहर लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वतः लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्.फिल्. पदवीसाठी विद्यापीठात सादर केला आहे.

स्थळ : कोल्हापूर.

दिनांक : नोव्हेंबर, १९८९. ( सोपान रामलाल शेंडे )

अभ्यासक

## :: प्रमाण पत्र ::

श्री•सोपान रामलाल शेंडे यांनी इतिहास विषयातील एम्•फिल्• पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा " मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन " ( Religious Life in Maharashtra under the Marathas ) हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे• श्री•शेंडे यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे•

स्थळ : कोल्हापूर•

दिनांक : नोव्हेंबर,१९८९•

( डॉ•मनोहर लोहार )
संशोधन मार्गदर्शक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर•

# प्रास्ताविक

" मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन " (Religious Life in Maharashtra under the Marathas ) हा शोधप्रबंध मी एम्.फील पदवीसाठी सादर करीत आहे. हा प्रबंध मराठीमध्ये लिहीण्याची शिवाजी विद्यापीठाने मला परवानगी दिल्याने मी प्रथमत: विद्यापीठाचे आभार मानतो आणि हा प्रबंध सादर करण्यामागचा हेतू अल्पशा प्रास्ताविकामध्ये पुढील प्रमाणे सादर करतो.

१९ व्या - २० व्या शतकात इतिहासाच्या अभ्यासाचे क्षेत्र व्यापक बनलेले आहे. इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ही बदललेला आहे. इतिहासामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनाचाच नव्हे तर मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगाचा अभ्यास केला जातो. मराठ्यांच्या इतिहासात आर्थिक, राजकीय व कांही प्रमाणात सामाजिक जीवनाचा अभ्यास झालेला दिसून येतो. परंतु मराठे कालीन धार्मिक जीवनाचा स्वतंत्ररित्या अभ्यास केलेला दिसून येत नाही. त्यामुळे मराठेकालीन धार्मिक जीवन हे मराठा इतिहासाच्या अभ्यासकांकडून दुर्लक्षीले गेलेले होते. अशा या दुर्लक्षीत पण महत्वाच्या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे वाटले.

धर्माला मानवी संस्कृतिच्या इतिहासात प्राचीन काळापासून महत्वाचे स्थान लाभलेले आहे. व्यक्तीजीवन आणि समाजजीवन यांचे नियमन धर्म करतो. ईश्वरावरील श्रध्दा, पवित्र-अपवित्र या मधील भेदाची भावना, पवित्र मानलेल्या गोष्टींच्या संबंधी व्रत-विधी, नैतिक आचार-संहितेवरील विश्वास, ईश्वर, दैवते किंवा पूज्य गोष्टी वा व्यक्ती यांची प्रार्थना, व्यक्ती वा समुह यांच्या धार्मिक विचारांना व आचारांना

मार्गदर्शन करणारे ग्रंथ इत्यादी गोष्टीसंबंधीचा विचार धार्मिक जीवनामध्ये केला जातो. या सर्व अंगांचा अभ्यास करणे गरजेचे वाटले.

हा शोधप्रबंध लिहीण्यासाठी पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, मराठयांच्या इतिहासाची साधने, पेशवे रोजनीशी, भारतीय इतिहास संशोधन मंडळ पूणे यांनी संपादीत केलेली त्रैमासिके, ऐतिहासिक लेख संग्रह , शिवकालीन पत्रसार संग्रह, सनदा पत्रातील माहिती, शिवभारत,प्रणालपर्वत ग्रहणाख्यान, मराठे कालावर लिहिले गेलेले बखर वाङ्मय इत्यादी प्राथमिक साधने, ज्युबॉईस, मनुची, ग्रँट डफ, जॉन फ्रायर, खाफीखान इत्यादी तत्कालीन इतिहासकार व प्रवाशानी केलेले लेखन शेख महंमद, रामदासस्वामी, संत तुकाराम इत्यादी संताचे वाङ्मय, तसेच संत व धार्मिक स्थळे यांच्यावर लिहीले गेलेले लेखन, धर्मशास्त्र, संस्कार, सामाजिक संघटन इत्यादी विषयावर लिहिले गेलेले समाजशास्त्रीय ग्रंथ व मराठे काळावर लिहीले गेलेले लेखन या सर्व साधनांचा उपयोग हा प्रबंध लिहिण्यासाठी झाला.

या प्रबंधामध्ये एकूण पाच प्रकरणे आहेत. पहील्या प्रकरणात धर्म ही संकल्पना साधनांच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठेकालीन महाराष्ट्रात असणारे धर्म व पंथ यांचा विचार केलेला आहे. प्रकरण दोन मध्ये मराठेकालीन महाराष्ट्रातील सणउत्सव व विविध संस्कार यांचा विचार केलेला आहे. यात मराठेकाळात साजरे होणारे सार्वजनिक सण, धार्मिक उत्सव व विविध शरीर संस्कार, तिर्थयात्रा इत्यादी विषयीची माहिती साधार निवेदन केलेली आहे. प्रकरण तीन मध्ये मराठेकालीन महाराष्ट्रात प्रसिध्दीस पावलेली व धार्मिकदृष्टया महत्वाची म्हणून गणल्या गेलेल्या धार्मिक स्थळांचा विचार केलेला असून त्यांचा सर्व सामान्यांपासून राज्यकर्त्यांपर्यंत सर्वांवर कसा प्रभाव होता हे साधार निवेदन केलेले आहे. प्रकरण चार मध्ये मराठेकालीन महाराष्ट्रावर ज्या संत-महंतांचा प्रभाव होता,

ज्यांनी तत्कालीन राजकिय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात महत्वाची भूमिका पार पाडली अशा संतांचे, त्यांचे वाङ्मय व इतर साधनांच्या आधारे विवेचन केलेले आहे. प्रकरण पाच मध्ये मराठे राज्यकर्त्यांच्या धार्मिक धोरणाचे तत्कालीन कागदपत्राच्या आधारे निवेदन केलेले आहे. व शेवटच्या प्रकरणात विषयाचा उपसंहार केला आहे.

शोधप्रबंधाच्या विषयाच्या निवडीपासून ते विद्यापीठाला प्रबंध सादर करेपर्यंत ज्या अनेक संस्था-व्यक्ती यांनी सहकार्य केले त्यांचे आभार मानने मी माझे नैतिक कर्तव्य समजतो.

माझे मार्गदर्शक डॉ.लोहार एम्.ए. यांनी विषयाची निवड करण्यापासून ते प्रंबंध सादर करेपर्यंन्त अतीशय सहानुभूतीने, अचूक व योग्य मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ.कांबळे बी.आर. यांनी आपला अमुल्य वेळ देवून वरचेवर मार्गदर्शन केले. तसेच इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांनी प्रेमाची व सहानुभूतीची वागणूक दिली व वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या शोधप्रबंधाचे काम पूर्ण करण्याच्या कामी शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवक वर्गाने मोलाचे सहकार्य केले, त्याचप्रमाणे शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ.विलास संगवे व शाहू लोकजीवन वस्तु संग्रहालयाचे क्युरेटर, माझे मित्र श्री.तुकाराम पाटील, यांनी दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध करुन दिले व वेळोवेळी मार्गदर्शन केले, राजाराम कॉलेजच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवकवर्ग यांनी आवश्यक सहकार्य केले, त्याचप्रमाणे मराठवाडा विद्यापीठातील इतिहासाचे प्रा. डॉ.पी.ए.गवळी यांनी योग्य वेळी मार्गदर्शन केले. वरील सर्वांच्या सहकार्यानेच मी माझा शोधप्रबंध पूर्ण करु शकलो. त्यामुळे वरील सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

मा•रामचंद्र गंगाधर फाटके यांनी मला संशोधन कार्याची प्रेरणा दिली त्यामुळे मी संशोधनासारख्या विषयाकडे वळलो• त्याच प्रमाणे माझे माता-पिता, बंधू व पत्नी सौ•मंगला शेंडे यांनी आर्थिक ओढाताण-सहन करुन माझ्या शोध प्रबंधासाठी पैसा उपलब्ध करुन दिला• माझे सर्व स्नेही यांनीही मला वेळोवेळी आर्थिक मदत करुन माझ्या या कार्यास हातभार लावला• श्री•गजानन चंद्रकांत गोमासे यांनी अतीशय कमी वेळात टंकलेखन व्यवस्थितरित्या पूर्ण केले• त्यामुळे या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे•

ज्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मला या कामी सहकार्य केले त्याबद्दल या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे• अशाप्रकारे मी तयार केलेल्या या प्रबंधाचे वाचकांकडून व जिज्ञासुकडून योग्य स्वागत होईल व दाद मिळेल असा विश्वास वाटतो•

सोपान रामलाल शेंडे
अभ्यासक

# अ नु क्र म णि का


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रास्ताविक | - | १ - ४ |
| प्रकरण १ ले : धर्म व पंथ | - | ६ - ६५ |
| प्रकरण २ रे : मराठेकालीन महाराष्ट्रातील संस्कार-सण-व उत्सव | | ६६ - ११९ |
| प्रकरण ३ रे : मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे | | १२० - १७८ |
| प्रकरण ४ थे : मराठेकालीन संत व संतकवि | | १७९ - २०८ |
| प्रकरण ५ वे : मराठा राज्यकर्त्यांचे धार्मिक धोरण | | २०९ - २५४ |
| उपसंहार | - | २५५ - २६४ |
| संदर्भ ग्रंथ सूची | - | २६५ - २७८ |


-x-x-x-x-x-